# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक ११.१०.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना घरफोडीचे मुद्देमालासह अटक.**

दिनांक ११.१०.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस ठाणे हद्दीत गोरेवाडा वस्ती येथे एका चार चाकी वाहनामध्ये ०४ इसम संशयीतरित्या दिसल्याने त्यांना थांबवून पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे क्र. १) इमरान अल्ताफ खान, वय २८ वर्षे, रा. गोदावरी झोपडपट्टी, श्याम लॉनजवळ, रोज कॉलोनी, नागपूर २) जयंत सतीश कांबळे, वय २६ वर्षे ३) आकाश सदाराम धुर्वे दोन्ही रा. परसोडी, केळवद, सावनेर, जी. नागपुर ४) निखील दिनंश कैथवास वय २६ वर्षे रा. राहुल नगर, न्यु बुध्द विहाराजवळ, सोमलवाडा, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्यांची व वाहनाची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात एक लोखंडी चाकु व वाहनामध्ये ०२ टि.व्हि., होम थिएटर, लॅपटॉप, गेम प्ले स्टेशन, चांदीचे वेगवेगळे भांडे, ०२ पाण्याच्या मोटर, ०३ मोबाईल फोन व असा मुद्देमाल मिळाल्याने त्यांना मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्यांनी नमुद मुद्देमाल हा भंडारा येथून चोरी केल्याचे सांगीतले. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १२४, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींचे ताब्यातून वरील मुद्देमालासह पांढऱ्या रंगाची इनोवा कार क्र. एमएच ४८ एफ ०९९७ असा एकुण किंमती १६,४६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना गुन्ह्यात अटक कण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती अण्णपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि क्र ०२), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. सारंग मिराशी, पोनि गुन्हे देवाजी नरोटे, सपोनि. बालाजी लालपालवाले, पोउपनि. खुशाल राठोड, पोहवा. विश्वास बलादे, चंद्रशेखर यादव, सतीश ठाकुर, विशाल नांदेकर, पोअं. घनश्याम बोरकर, नितेश वाकडे, राजेंद्र वानखेडे, आकाश लोथे, अमित तांडेकर, यांनी केली.



**२) ईमामवाडा पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या पाहिजे आरोपीस अटक.**

दिनांक ०४.१०.२०२६ चे २३.५९ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत शितलामाता मंदीरजवळ जाटतरोडी नं. ०२ येथे फिर्यादी अमेय अमृतलाल धुर्वे, वय २० वर्षे, रा. जाटतरोडी नं. ०३, ईमामवाडा हा त्याचे मित्रांसोबत गप्पा करीत बसलेले असता, आरोपी मृणाल गजभिये व त्याचा मित्र तक्कु असे त्यांचे चार चाकी गाडीने तेथे आले. व फिर्यादी तसेच त्यांचे मित्रांना शिवीगाळ करून त्यांचेजवळील अग्नीशस्त्र हवेत फिरविले व जमीनीवर एक राऊंड फायर करून दहशत निर्माण केली व तेथून निघून गेले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे कलम २९६,३५२,३(५) भा.न्या.सं., सहकलम ३, २५, २७ (१) भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ईमामवाडा पोलीसांचे तपास पथकाने गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचुन १०.१०.२०२६ चे रात्री गुन्ह्यातील पाहिजे आरोपी निखील उर्फ टप्पु संतोष सावडीया, वय २६ वर्षे रा. ४०५, पटवर्धन अपार्टमेन्ट, भोंडा महादेव मंदीरजवळ, टेकडी रोड, नागपूर यास आऊटर रिंग रोड पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन एक स्टीलची पिस्टल मॅगझीनसह किंमती अंदाजे ४०,०००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसेत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षीण प्रभाग) मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. महेश चव्हान, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जयवंत पाटील, पोउपनि. अजय कवर, आदित्य मडावी, पोहवा. संदीप बोरसरे, विरेंद्र गुळरांधे, चंद्रशेखर कौरती, पोअं. जितेंद्र चौधरी व रंजीत सक्करवार यांनी केली.

**३) अंबाझरी पोलीसांची कामगीरी :— चोरीचा गुन्हा उघडकीस, ०२ आरोपींना अटक.**

फिर्यादी पराग प्रकाशराव बेलोरकर, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट नं. ३२१, गांधीनगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, गांधीनगर येथे निर्माणाधीन ईमारतीचे बांधकाम सुरू होते. दिनांक ०७.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०८.१०.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे निर्माणाधीन बिल्डींगचे सिलींग व भिंतीला लावलेले कॉपर वायर २० किलो व ए सी फिटींगचा कॉपर पाईप असा एकुण किंमती ४५,०००/—रू. चा मुद्द्देमाल कापून चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान अंबाझरी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न करून आरोपी १) वैभव उर्फ वांढऱ्या संजय वानरे वय २० वर्षे रा. संजय नगर, पांढराबोडी, नागपुर यास ताब्यात घेऊन गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचा साथीदार प्रवीण उर्फ नाईन्टी तेजलाल भलावी, वय २४ वर्षे, रा. संजय नगर, पांढराबोडी, नागपुर याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना ताब्यातुन गुन्हयातील चोरी केलेला जळालेला कॉपर तार तसेच, गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एमएच ३१ जीई ७३२२ असा एकुण किंमती ९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अण्णपूर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री विनोद गोडबोले, पोउपनि. निलेश पदकोंडे, पोहवा. कमलेश ननीर, पोअं. अमित तिवारी, मनिष रामटेके व शत्रुघ्न यांनी केली.




**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे वाडी :– हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक १०.१०.२०२६ चे २३.४० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, प्लॉट नं. ३८६, न्यु स्टार पब्लीक स्कुलजवळ, सोनबा नगर येथे राहणारा हद्दपार इसम घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून तेथे गेले असता, एक इसम पोलीसांना पाहुन पळण्याचे प्रयत्नात असता, त्यास ताब्यात घेतले पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अशोक उर्फ भोला मोहन निंबाळकर वय ४२ वर्षे असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ५५५५/२०२५ दिनांक ०६.११.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे बजाजनगर</u> :–** दिनांक १०.१०.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत अभ्यंकर चौक येथे फिर्यादीचे नातेवाईक नामे मोहम्मद जावेद अब्दुल सलीम, वय ५० वर्षे रा. मोहम्मद अली रोड, काला कुआ, भालदारपूरा नागपूर हे त्याचे मित्रासह लाइटींग लावण्याचे कामाकरीता गेले होते. लोखंडाचे शिडीवर चढून लाइटींग लावत असता, अचानक पाय स्लीप झाल्याने ते खाली पडून डोक्याला मार लागल्याने गंभीर जखमी झाले. त्यांचे सोबत काम करणारे यांनी त्यांना उपचाराकरीता सिम्स हॉस्पीटल येथे दाखल केले होते, उपचारादरम्यान दिनांक ११.१०.२०२६ चे ०४.०५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यात्रकरणी फिर्यादी मुस्ताक गुलाम नबी शेख, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. २७५, गोल मैदान, सतरंजीपूरा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. अतुल आडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**